महाराष्ट्र शासन
गृह विभाग

शासन ज्ञापन क्रमांक : सीआरपी-०५१३/प्र.क्र.१४४ (भाग-२)/पोल-७.

मंत्रालय, दुसरा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२.

दिनांक : १७ नोव्हेंबर, २०१७.

विषय :- पोलीस आयुक्त, नागपूर शहर, यांच्या अधिकारक्षेत्रातील पोलीस ठाणे, कोराडी, तालुका-कामठी, जिल्हा-नागपूर, याच्याकरिता नवीन प्रशासकीय इमारतीच्या बांधकामातील उरलेली कामे करण्यास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

संदर्भ :- १) शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक सीआरपी-०५१६/प्र.क्र.१४४/पोल-७, दिनांक १०.०५.२०१३.

२) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. विअप्र-२०१४/ प्र.क्र.४९/ १४/ विनियम, दिनांक ०५.०१.२०१५.

३) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/१३/विनियम, भाग-२, दिनांक १७.०४.२०१५.

४) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई, यांचे पत्र क्र. पोमसं/ २७-बी/ २८-बी-२/ पो.ठा.कोराडी.प्रइमा.निवा./ ६३/ २००८, दिनांक १३.०५.२०१६.

५) शासन पत्र, गृह विभाग, क्रमांक सीआरपी-०५१६/प्र.क्र.१४४ (भाग-२)/ पोल-७, दिनांक ०५.०६.२०१७.

६) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई, यांचे पत्र क्र. पोमसं/ २७-बी/ २८-बी-२/ पो.ठा.कोराडी.प्रइमा.निवा./ ६३/२०, दिनांक १६.०९.२०१७.

ज्ञापन.-

पोलीस आयुक्त, नागपूर शहर, यांच्या अधिकारक्षेत्रातील पोलीस ठाणे, कोराडी, तालुका-कामठी, जिल्हा-नागपूर, याच्याकरिता नवीन प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करण्यासाठी *शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक सीआरपी-०५१३/प्र.क्र.१४४/पोल-७*, दिनांक १०.०५.२०१३, द्वारे रु.१,५२,०९,०००/- इतक्या खर्चाच्या अंदाजास प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. हे खर्चाचे अंदाज सन २०१०-११ च्या दरसूचीवर आधारित होते. या कामात तळ मजल्याचे ४६८.६६ चौरस मीटर आणि पहिल्या मजल्याचे २९३.२८ चौरस मीटर इतक्या बांधकाम क्षेत्रफळाचा समावेश आहे.

२. उक्त कामासाठी प्रथम रु.१,१४,०७,०००/- *(शा.नि., गृ.वि., क्र.सीआरपी-०८१२/ प्र.क्र.३७२/पोल-७, दिनांक ०७.०८.२०१२)* आणि नंतर रु.३८,०२,०००/- *(पोलीस महासंचालक, म.रा., मुंबई, यांच्या कार्यालयाचे दिनांक ०५.०३.२०१५ रोजीचे आदेश)* असे एकूण रु.१,५२,०९,०००/- इतका निधी उपलब्ध करण्यात आला होता.

३. तथापि, दरवाढ, इमारतीच्या पायातील बदल, इत्यादि बाबींमुळे उपलब्ध निधीत फक्त तळ मजल्याचे बांधकाम पूर्ण करता आले. पहिल्या मजल्याचे संपूर्ण बांधकाम (२९३.२८

चौरस मीटर क्षेत्रफळ) बाकी आहे. हे बांधकाम पूर्ण करण्याचा प्रस्ताव पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई, यांनी सादर केला आहे.

४. उक्त कामासाठी रु.६९,८२,७७७/- इतक्या आधिक्याचे *(excess)* खर्चाचे अंदाज सादर करण्यात आले आहेत. यामध्ये विद्युतीकरण, पाणीपुरवठा, इत्यादि बाबींचा समावेश आहे.

५. उक्त खर्चाचे अंदाज हे उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, क्रमांक ६, नागपूर, यांनी सन २०१५-१६ च्या दरसूचीनुसार तयार केले असून ते कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग (विशेष प्रकल्प), नागपूर, आणि अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडल, नागपूर, यांनी साक्षांकित केले आहेत.

६. उक्त खर्चाचे अंदाज हे सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, यांनी तपासले आहेत व ते **रु.८५.३६ लक्ष** असे सुधारित केले आहेत आणि विवक्षित अटींवर प्रशासकीय मान्यता देण्यास सहमती दिली आहे.

७. त्या अनुसार, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, यांच्या अधिकारक्षेत्रातील पोलीस ठाणे, कोराडी, तालुका-कामठी, जिल्हा-नागपूर, याच्याकरिता नवीन प्रशासकीय इमारतीच्या बांधकामातील उरलेली कामे करण्यासाठी **रु.८५.३६ लक्ष** इतक्या खर्चाच्या अंदाजास, पुढील अटींवर, याद्वारे, प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे:-

१) बांधकामाचा नमुना नकाशा, मांडणी नकाशा आणि विस्तृत नकाशा यांना वास्तुशास्त्रज्ञाकडून मंजूरी घेऊनच काम सुरु करावे.
२) ढोबळ स्वरुपात धरण्यात आलेल्या तरतुदींबाबत विस्तृत खर्चाचे अंदाज मंजूर करुनच काम हाती घ्यावे.
३) प्रत्यक्ष काम करताना शासन निर्णय, पर्यावरण विभाग, क्र.इएनव्ही-२०१३/ प्र.क्र.१७७/तां.क.१, दिनांक १०.०१.२०१४, अनुसार कार्यवाही करावी.
४) शासन निर्णय, सार्वजनिक बांधकाम विभाग, क्रमांक बीडीजी-२०१७/ प्र.क्र.६०/ इमारती-२, दिनांक ०७.०७.२०१७, अनुसार कार्यवाही करण्यात यावी.
५) खर्चाचे अंदाज हे पोलीस आयुक्त, नागपूर शहर, यांनी साक्षांकित करावे.
६) निधी उपलब्ध झाल्याशिवाय बांधकामास सुरवात करु नये.

८. उक्त कामासाठी येणारा खर्च हा गृह विभाग--मागणी क्रमांक बी-१०, ४०७०, इतर प्रशासनिक सेवांवरील भांडवली खर्च, (००) ८००, इतर खर्च, (००)(११) महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण पोलीस विभागाच्या कार्यालयीन इमारतीचे बांधकाम करणे, (४०७० ०२११), ५३, मोठी बांधकामे, याखाली उपलब्ध असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

९. हे ज्ञापन सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.१९२/इमा-२, दिनांक ०१.११.२०१७, अन्वये मिळालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

१०. हे शासन ज्ञापन महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेतांक २०१७१११७१८००५६१९२९ असा आहे. हे ज्ञापन डीजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Swapnil Gopal Borse

Digitally signed by Swapnil Gopal Borse
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=66835707253ff77ef0e333eb3ad582f9b876d443b2654088832e43dcad21c52a, cn=Swapnil Gopal Borse
Date: 2017.11.17 18:04:40 +05'30'

(स्वप्नील गोपाल बोरसे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) पोलीस आयुक्त, नागपूर शहर.

प्रत :-

१) अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडल, नागपूर (*सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, यांनी दिलेल्या "Recapitulation Sheet" च्या प्रतीसह).*
२) कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग (विशेष प्रकल्प), नागपूर. (*सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, यांनी दिलेल्या "Recapitulation Sheet" च्या प्रतीसह).*
३) जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर.
४) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर.
५) कार्यासन अधिकारी (इमा-२), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई.
६) कार्यासन अधिकारी, वित्त विभाग (व्यय-७), मंत्रालय, मुंबई.
७) निवड फाईल (पोल-७).